| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २११ वा | सोमवार दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिणे, चांदीचे दागिणे व रोख रक्कमेची चोरी

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी चंद्रकला रविंद्र कराड, वय ४५ वर्षे, रा.माळकरंजा ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घराचा कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२३.१०.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम २७,००० असा एकुण ४७,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-चंद्रकला कराड यांनी दि.३०.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५(ए), ३३१(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कळंब येथून मोटारसायकल चोरली

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी हनुमंत तुकाराम कदम, वय ४६ वर्षे, रा. ईटकुर ता. कळंब जि. धाराशिव यांची मोटरसायकल अंदाजे २०,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने दि.२८.१०.२०२५ सुनिता सुंदर बोबडे यांचे परळी रोड लक्ष्मीनगर कळंब येथील घरासमोरुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हनुमंत कदम यांनी दि.३०.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून बांधून ठेवणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, विनोद त्र्यंबक काळदाते, वय ३७ वर्षे, रा. येळंब ता. बार्शी जि. सोलापुर, रामेश्वर उर्फ आण्णा अभिमान गलांडे, वय ३६ वर्षे, रा. येळंब ता. बार्शी जि. सोलापूर यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी .वैराग नाका येथे भिमनगरकडे जाणारे स्मशानभुमि जवळ पिकअप क्र एमएच १३ ई.पी.०८४५ मध्ये गोवंशीय जातीचे ४ जर्शी गाय एकुण ६५,००० किंमतीच्या वा-हनासह ८,६५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचेजर्शी गाय त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (बी) सह कलम ५(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत संतोष आण्णा कुह्राडे, सुर्लेगाव पोस्ट गुळज ता. गेवराई यांची मोटरसायकल अज्ञात व्यक्तीने दि.२०.१०.२०२५ रोजी बसस्थानक येरमाळा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे आणखी एक मोठे यश

### राष्ट्रीय महामार्गावर जॅक टाकून चोरी करणारी अंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या आवळल्या



धाराशिव (प्रतिनिधी)- दि. ०१/११ रोजी धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेला एक मोठे यश हाता आले. राष्ट्रीय महामार्गावर मध्यारात्री जॅक टाकून प्रवाश्यांच्या गाड्या बंद पाडून दरोडा टाकून लूटणार्या टोळीच्या मुसक्या आवळण्यात आलेल्या आहेत. मागील काही दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत होत्या. अगदी मध्यरात्री भर राष्ट्रीय महामार्गावरती अशा घटना घडत होत्या. त्यामुळे सामान्य जनतेच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. त्यातच दि. १६/१०/२०२५ रोजीच्या मध्यारात्री उमरग्याकडून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या एका डॉक्टरचे कुटुंबियांना अशाच प्रकारे लुटण्याचा प्रकार घडला होता. त्याबाबत पोलीस ठाणे मुरुम येथे डॉ. अब्दुल गफूर अब्दुल रउफ जनैदी यांच्या तक्रारीवरून गु.र.नं. ३०९/२०२५ क. ३१०(२), ३११, अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभिर्य लक्षात घेवून धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती. रीतु खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी विनोद ईज्जपवार यांना सदरील गुन्ह्याचा तातडीने तपास लावण्याबाबत सुचीत केले होते. त्या अनुसार पोलीस निरीक्षक विनोद ईज्जपवार यांनी आपले आधिनस्त पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांना सोबत घेवून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आणि त्यांचे प्रयत्नांना आज यश आले. सदरील गुन्हा उघडकीस आणण्याकरिती तांत्रिक माहिती प्राप्त करून त्याचे विश्लेषण करण्यात आले तसेच पारंपारीक पध्दतीचा देखील वापर करून गन्ह्यातील आरोपी आणि वापरलेली वाहन निष्पन्न करण्यात आले. त्यापैकी अर्जून बालाजी शिंदे, आशोक हिरामन शिंदे यास ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी पोलीस ठाणे मुरूम हद्दीतील दरोडा ईतर चार साथीदारांच्या मदतीने घातल्याचे कबुल केले, तसेच त्यांनी जळगाव जिल्ह्यातही अशाच प्रकारे राष्ट्रीय महामार्गावरती जॅक टाकून गाडी अडवून दरोडा टाकल्याची माहिती दिली. मुरूम येथील गुन्ह्यात वापरलेली दणत५०० गाडी आणि जॅक जप्त करण्यात आलेला आहे. त्यासोबतच जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव पोलीस ठाणे हद्दीत केलेल्या दरोड्यातील ट्रक देखील जप्त करण्यात आलेला आहे.

सदरील कामगिरी श्रीमती रीतु खोखर कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद ईज्जपवार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव, सुदर्शन कासार स.पो.नि., पोलीस अंमलदार शौकत पठाण, पोलीस अंमलदार प्रकाश औताडे, पोलीस अंमलदार जावेद काझी, महीला पोलीस अंमलदार शोभा बांगर, पोलीस अंमलदार फरहान पठाण, पोलीस अंमलदार राठोड, चालक पोलीस अंमलदार सुभाष चौरे, चालक पोलीस अंमलदार प्रकाश बोईनवाड, चालक पोलीस अंमलदार रत्नदीप डोंगरे, चालक पोलीस अंमलदार नागनाथ गुरव. सदरील कामगीरी यशस्वीरित्या पार पाडण्यात टठढआणि ठउझ पथकाने महत्वपूर्ण भुमिका बजावलेली आहे.अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, हुसेन दगडु औटे, वय ५० वर्षे, आनंद सुभाष सपाटे, वय ३८ वर्षे, दोघे रा. केशेगाव ता. जि. धाराशिव यांनी दि.३१.१०.२०२५ रोजी केशेगाव येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोस्ती पान शॉपमध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ डायरेक्टर पान मसाला, बादशाहा गुटखा, विमल पान मसाला, व्ही१ तंबाखु चे पुडा असा एकुण ६,५८० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करत असताना बेंबळी पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३,२२३, २७४, २७५,३(५) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत मुब्बशीर नासेर सय्यद, वय २४ वर्षे, सुयश सुनिल वाघमारे, वय ३२ वर्षे, दोघे रा. सांळुके नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी होळकर चौक धाराशिव येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व बादशाहा गुटखा, विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखु सह हिरो होंडा मोटरसायकल असे एकुण ४४,७५० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करत असताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-१२३, २२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा मानके कायदा कलम ५९ अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## युवक, महिलांच्या हाती देशभक्तिपर संदेशाचे फलक: नळदुर्ग शहरपोलिस ठाण्याच्या वतीने एकता दौड, वॉक फॉर युनिटीचे आयोजन




नळदुर्ग(प्रतिनिधी)- भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त पोलिस ठाण्याच्या पुढाकाराने नळदुर्गमध्ये एकता दौड वॉक फॉर युनिटी हा प्रेरणादायी, जनजागृतीपर आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारा उपक्रम ३१ ऑक्टोबर रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सहभागी पोलिस अधिकारी, युवक, युवती, महिला आणि नागरिकांनी हातात फलक घेऊन देशभक्तीचा संदेश देत भारत माता की जय आणि वंदे मातरम्च्या जयघोषांनी वातावरण भारावून टाकले.

या भव्य उपक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला गेट येथून निघून चावडी चौक, भवानी चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, बस स्टँड मार्गाने निघाली. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे या दौडीची सांगता झाली. संपूर्ण शहरातून राष्ट्रीय एकता हीच खरी शक्ती, ज्ञान हीच खरी संपत्ती, मुलगी शिकली तर प्रगती झाली, अशा प्रभावी घोषणांचा गजर होत होता. या उपक्रमात नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव, पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे व संतोष गीते, महामार्ग पोलिस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षक अमृता पटाईत, महामार्ग पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विकास राठोड, एकता दौडचे जिल्हा संयोजक साहेबराव घुगे आदी मान्यवर उपस्थित होते. यामध्ये कर्मचारी, पोलिस पाटील, पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षणार्थी युवक-युवती, तसेच शहरातील नागरिक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला. महिला व तरुणींनी मुलगी शिकली तर प्रगती झाली या संदेशासह समाजात स्त्रीशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शहरभर घोषवाक्ये, फलक आणि देशप्रेमाच्या रंगांनी सजलेले वातावरण पाहून नागरिकांनी पोलिस दलाच्या या उपक्रमाचे स्वागत केले.

## वीरमाता, दिवंगत सैनिकांच्या पत्नींचा सन्मान

### माजी सैनिक संघटनेचे कार्य कौतुकास्पद: प्रल्हाद सूर्यवंशी



उमरगा (प्रतिनिधी)- देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या, देशाच्या सीमेवर सेवा बजावलेल्या दिवंगत सैनिकांच्या वीरपत्नी, वीरमातांची साडी व सन्मानचिन्ह देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आल्या.

उमरगा तालुका माजी सैनिक संघटनेचे काम चांगले असून, माजी सैनिकांच्या वीरमाता व वीरपत्नी यांचा सन्मान केला, असे मत उमरगा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. शहरातील शांताई मंगल कार्यालयात भारतीय माजी सैनिक संघटना व माजी सैनिक सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित वीरमाता, वीरपत्नी व दिवंगत माजी सैनिकांच्या पत्नी यांचा सन्मान सोहळा गुरुवारी (दि. ३०) आयोजित करण्यात आला होता. या वेळी ते बोलत होते.

या वेळी सूर्यवंशी म्हणाले, तालुक्यात माजी सैनिकांना आर्थिक बळ देणारी संस्था व उमरगा, लोहारा तालुक्यातील सैनिकांना एकत्र ठेवण्याचा कार्य खूपच मोलाचे आहे.

अध्यक्ष शहाजी चालुक्य यांनी मेहनत घेऊन केलेले कार्य उल्लेखनीय आहे. प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटकातील बिदरचे जिल्ह्यध्यक्ष पंडाप्पा मेठरे, डॉ. व्यंकटराव तेलंग, श्री. जगन्नाथ खामकर, तसेच जिल्हा सैनिक कार्यालय धाराशिव गुरुनाथ कुलकर्णी, तुळजापूर अध्यक्ष तानाजी जाधव यांच्यासह माजी सैनिक उपस्थित होते. राजेंद्र बेंडकाळे यांनी आभार मानले. सरिता उपासे व खंडू दुधभाते यांनी सूत्रसंचालन केले.

राजेसाहेब, शेंडगे, पवारांना सैनिक पुरस्कार सोनाजी राजेसाहेब कळंब संस्थापक अध्यक्ष व बालाजी शेंडगे माजी सहायक सैनिक कल्याण अधिकारी, यवतमाळ व माजी सैनिक संघटना जळकोटवाडी अध्यक्ष सुरेश पवार या तिघांचा या वर्षीचा सैनिक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## अ. भा. समता परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त

### वृक्षारोपण, वृद्धाश्रमात फळे वाटप



धाराशिव (प्रतिनिधी)- अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या ३३ व्या वर्धापन दिनानिमित्त समता गृहनिर्माण सोसायटी धाराशिव येथे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सहारा वृद्धाश्रम येथे वृद्धांना फळे वाटप करण्यात आली.

समता गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन नानासाहेब घाडगे, सदस्य वासुदेव वेदपाठक यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत, जिल्हाध्यक्ष विभीषण खुणे, भूम तालुकाध्यक्ष संतोष डोरले, धाराशिव तालुकाध्यक्ष व्यंकट जाधव, तुळजापूर तालुकाध्यक्ष मनोज वाघमारे, अनुदेव मारकड, भजनदास जगताप, रुपेश बनसोडे, अभिजीत नलावडे यांच्यासह बहुसंख्य समता सैनिक उपस्थित होते. यावेळी समता परिषदेच्या संघटन बांधणीसाठी आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी १ नोव्हेंबर १९९२ रोजी महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने बहुजनांचे नेते छगन भुजबळ यांच्या नेतृत्त्वात मुंबई येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची स्थापना करण्यात आली. या घटनेला ३३ वर्षे पूर्ण झाली. संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त तुळजापूर तालुक्यातील सहारा वृद्धाश्रम येथे फळे वाटप करण्यात आली. यावेळी वृद्धाश्रमाचे संचालक राहुल भड, संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत यांच्यासह इतर पदाधिकारी, वृद्धाश्रमातील वृद्ध मंडळी उपस्थित होते.

## शासकीय रुग्णालयातील रक्त साठा कमी असुन रक्तदात्यांनी रक्तदान करावे

धाराशिव (प्रतिनिधी)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथील रक्त संचलन विभागातील रक्त साठा कमी असुन रक्ताची कमतरता भासत आहे,रक्तदाते यांनी रक्तदान करणे गरजेचे असून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात यावे,रुग्णांना रक्ताची गरज असुन सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी याबाबत पावले उचलावीत, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे,आपण हक्काने शासकीय रुग्णालयात रक्ताची मागणी करतो त्याच हक्काने रक्तदान करणे हे देखील आपले कर्तव्य आहे, यासाठी रक्तदात्यांनी शासकीय रक्त संचलन विभागात किंवा आपल्या सोयीनुसार रक्तदान शिबिराचे आयोजन करुन मानवहितासाठी रक्तदान करावे असे आवाहन गणेश रानबा वाघमारे सदस्य,सुरक्षा समिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव यांनी केले आहे.

## गौणखनिज वाळु चोरुन घेवून जाताना पकडले

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अजय निमगाव(मा) ता. माढा जि. सोलापूर यांनी दि.२९.१०.२०२५ रोजी २१.३० वा. सु. मुगाव पाटी येथे आपल्या ताब्यातील टिप्पर कृर एमएच ४२ एक्यु५३३८ मध्ये गौणखनिज ३ ब्रास वाळु विनापरवाना वाहतुक करुन चोरुन घेवून जात असताना आंबी पोलीसांना मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सागर हरिदास अंधारे, नेमणुक एसडीपीओ कार्यालय भुम यांनी दि.३०.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म्‌ भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात्‌ ।।

# लातूर समाचार

## ही एक मोठी सामाजिक समस्या

मुळात सध्याचे युग माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. या युगात रमणाऱ्या प्रत्येकाच्या हातात मोबाईल दिसतोच ! जणू मोबाईल म्हणजे भ्रमणभाषेने सर्वांचे आयुष्यच व्यापून टाकले आहे. अगदी १-२ वर्षांच्या मुलांना जेवण भरवतांना आई त्यांच्या हातात भ्रमणभाष मोबाईल देतांना दिसते आणि आयुष्याचा शेवट जवळ आलेला असतांनाही हातात जपमाळ किंवा पोथी वगैरे नव्हे, तर भ्रमणभाष घेऊनच श्वास मोजणारे वृद्ध आपल्याला पहायला मिळतात. काही वर्षांपूर्वी वृद्धांनी मोबाईल हाताळण्याचे प्रमाण अगदी नगण्य होते; पण आता सर्वांनीच ते तंत्रज्ञान आत्मसात केलेले असल्याने ७० ते ८० वयाचे वृद्धही तरुण पिढीप्रमाणे मोबाईलच्या जाळ्यात अडकतच चालले आहेत. खरेतर जे वय सर्वांतून मुक्त होण्याचे असते, त्याच वयात पुन्हा सर्व गोष्टींमध्ये अडकणे, म्हणजे आयुष्य व्यर्थ घालवणे होय. ब्रिटनमधील 'नॅशनल गेमिंग डिसऑर्डर सेंटर'मध्ये वृद्धांचे उपचार घेण्याचे प्रमाण वाढत आहे. आधी तेथे केवळ किशोरवयीन मुलेच येत असत. ब्रिटनमधील स्थिती आता भारतातही निर्माण होत आहे. खरे पहाता ब्रिटनने भारताच्या विरोधात अनेकदा वैचारिक तंत्रे अवलंबण्याचा प्रयत्न केला. त्याचाच उलट परिणाम म्हणून तेथेही आता तशीच स्थिती निर्माण होत आहे. वृद्ध लोक दिवसातील अधिकाधिक काळ मोबाईलमध्येच डोके खुपसून बसलेले असतात. जणू काही सर्व इंद्रिये त्या मोबाईलमध्येच एकवटली जातात. त्यामुळे त्यांना स्थळ, काळ, वेळ यांचे भान उरत नाही. साहजिकच शरिरावर ताण येऊन दुखणी-खुपणी अधिक बळावतात. घंटोन्घंटे मालिका, चित्रपट पहाणे, 'रिल्स'मध्ये डोके खुपसणे, या व्यतिरिक्त वृद्ध लोक काहीच करत नाहीत आणि म्हणूनच विविध व्याधी पदरी पाडून घेतात. त्यांचे हात-पाय, डोळे, पाठ सर्व जणच असहकार पुकारतात. शारीरिक आणि मानसिक व्याधी जडतात. मग काय उरलीसुरली सर्वच वर्षे पलंगावर झोपून काढण्याची वेळ उद्भवते. अशा स्थितीत पूर्णत्वाकडे वाटचाल करणे तर दूरच; पण माया, तंत्रज्ञान यांच्या विळख्यात अडकून आयुष्य रडतखडत जगण्याची वेळ त्यांच्यावर येते. खरेतर निवृत्तीनंतरचा काळ किंवा वृद्धापकाळ यांत मनन, चिंतन, वाचन करणे, तसेच सामाजिक संवाद साधणे, छंद जोपासणे किंवा धार्मिक कार्यात सहभागी होणे, असे व्हायला हवे; पण या सगळ्यांना हद्दपार केले आहे, ते मोबाईलच्या अधिक वापराने ! मुलेही आई-वडिलांची कटकट नको; म्हणून त्यांना महागडे मोबाईल किंवा आयफोनसारखे मोबाईल घेऊन देतात. 'एकदा का त्यांच्या हातात हे मोबाईलरूपी खेळणे दिले की, आपण सुटलो !', असा त्यांचा भ्रम झालेला असतो; पण ते सुटणे नसते, तर अडकणे आणि अडकवणे असते. हे तरुण पालक आणि वृद्ध यांच्या लक्षात येत नाही. तंत्रज्ञानाचा वापर थांबवणे तर काही शक्य नाही; पण मर्यादा राखणे किंवा समतोल ठेवणे आवश्यक आहे. ज्येष्ठांकडे तर अनुभव आणि ज्ञान यांचा समृद्ध खजिना असतो. हा खजिना भ्रमणभाषलाही मागे टाकेल; पण माहिती आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकापुढे ज्येष्ठांचा ज्ञानरूपी खजिनाच लोप पावत चालला आहे. 'आजीबाईचा बटवा' तर कुठे हरवला आहे कुणास ठाऊक! हे परिणाम अधिक हानीकारक आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता आपल्या कुटुंबाची वीण, तसेच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जपणे, हे सर्वस्वी ज्येष्ठांच्या हातात असते. वृद्धांनी भ्रमणभाषच्या मागे जाऊन व्यसनी होऊ नये, ही काळाची आवश्यकता आहे. मोबाईल मुळे दिवसेंदिवस कुटुंबव्यवस्थाही उद्ध्वस्त होत आहे. अर्थात् यात दोष मोबाईलचा नव्हे, तर त्याच्या माध्यमातून अजेंडा चालवणाऱ्या साम्यवाद्यांचा आहे. त्यांचे कपट खरेतर वेळीच लक्षात घेऊन सतर्क रहायला हवे होते; पण 'साम्यवाद्यांच्या कारस्थानांना, तसेच लादल्या जाणाऱ्या पाश्चात्त्य विकृतीच्या विचारसरणीला माणूस भुलत चालला आहे आणि स्वतःच्या पायांवर धोंडा मारून घेत आहे', असे म्हटल्यास वावगे काय? आज ज्येष्ठांच्या हातात मोबाईलचा अतिरेकी वापर झाल्याने ते अप्रत्यक्षरित्या पंगू झाले आहेत. मोबाईलमुळे तरुण पिढीची तर वाताहत झाली आहे आणि होतही आहे. लहान मुलांच्या हातीही खेळण्यापेक्षा अधिक काळ मोबाईलच असतो. थोडक्यात काय, तर कुणालाही कुणाविषयी कसलेही सुवेरसुतक उरलेले नाही. 'मी आणि माझा मोबाईल' इतक्याच विश्वात आज प्रत्येक जण रमत आहे. याचा अपलाभ घेत साम्यवाद्यांनी पद्धतशीरपणे कुटुंबव्यवस्थेला सुरुंग लावला. कुटुंबव्यवस्था विभक्त होत चालल्याने विवाहव्यवस्थाही कोलमडली. परिणामी समाज अधोगतीकडे वाटचाल करत आहे. आई-वडील नोकरीसाठी कार्यालयात, मुले पाळणाघरात किंवा घरात एकटी, तर वृद्ध वृद्धाश्रमात दिसतात. ज्येष्ठ व्यक्ती नवी पिढी घडवते, हे चित्र दुर्दैवाने कोणत्याही घरात दिसून येत नाही. पाश्चात्त्य वेशभूषा करण्यात धन्यता मानणाऱ्या आई-आजीकडे पाहून मुलगी/नात काय धडा घेणार? सिगारेट ओढणे आणि दारू पिणे यांमुळे प्रतिष्ठा टिकवता येत असल्याचा उपदेश (?) देणाऱ्या वडिलांचा मुलगा अस्मिताशून्यच निपजणार! अशा स्थितीत ज्या देशाचे उद्दिष्टच 'राष्ट्राचे पुनर्निर्माण करणे' हे आहे, ते साध्य करणार कोण ? राष्ट्रोद्धाराची धुरा हाती घेणार कोण? राष्ट्राप्रमाणे धर्मही संकटातच आहे. विशेषतः हिंदु धर्माच्या संदर्भात हे अधिक प्रमाणात आहे; कारण आज हिंदु धर्मनिष्ठ नाही. त्यामुळे तो संस्कृतीला अगदी सहजतेने लाथाडून पाश्चात्त्य विकृतीला डोक्यावर घेऊन नाचवत आहे. अजाणतेपणी हिंदु संस्कृती नष्ट करत आहे. ज्येष्ठांच्या संदर्भातील वरील शोकांतिका पाहिली, तर त्यात अधिक प्रमाण हे हिंदूंचे असते; कारण या वयात त्यांना कुणीही वाली नसतो. याउलट अन्य धर्मियांमध्ये एखाद्याने कितीही विवाह केले आणि अनेक मुले जन्माला घातली, तरी ती मुले त्याच्या पालकांना कधीच अंतर देत नाहीत; कारण ती धर्माशी बांधील अन् एकनिष्ठ असतात. शेवटपर्यंत त्यांचे संगोपन करण्यात धन्यता मानतात; पण धर्मपालनाअभावी हिंदूंना दायित्वाचाच विसर पडतो आणि मग त्यात होरपळले जातात ते ज्येष्ठ अन् लहान मुले! त्यामुळे मोबाईलच्या अतिरेकामुळे नवे सामाजिक संकट उभा राहीले आहे ते संकट कसे परतवणारा ही मोठी समस्या एकट्याची नाही तर सामाजिक समस्या आहे.

# सोलापूर मालधक्का येथे माथाडी कामगार आणि चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन




**सोलापूर/प्रतिनिधी** : कर्मचारी कल्याण आणि सामुदायिक आरोग्यासाठी एक सक्रिय पाऊल म्हणून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २९ आणि ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर मालधक्का परिसरात, रामवाडी येथे माथाडी कामगार आणि ट्रक/टेम्पो चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले.

शिबिरादरम्यान एकूण ९४ एक्स-रे, ८१ रक्त चाचण्या, ५७ सायनस टीबी चाचण्या आणि १८ थुंकीच्या चाचण्या घेण्यात आल्या. सोलापूर महानगरपालिकेच्या क्षयरोग विभागातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या समर्पित टीमने आरोग्य तपासणी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

हा उपक्रम सोलापूर महानगरपालिका रुग्णालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता आणि सोलापूरच्या मुख्य वस्तू पर्यवेक्षक (सीजीएस) आणि त्यांच्या टीमकडून मौल्यवान सहकार्य मिळाले, ज्यामुळे सुरळीत समन्वय आणि सहभाग सुनिश्चित झाला.

पंतप्रधानांच्या ''क्षयरोग मुक्त भारत अभियान'' (क्षयरोगमुक्त भारत मोहीम २) अंतर्गत वस्तू हाताळणीच्या कामात गुंतलेल्या कामगारांमध्ये क्षयरोग आणि इतर आरोग्य समस्यांचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे आरोग्य शिबिर सोलापूर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि सार्वजनिक आरोग्यासाठीच्या सततच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते.

## चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाला माझी विद्यार्थिनी अस्मिता तिगोटे यांनी संपादित केलेला कवितासंग्रह सप्रेम भेट



**लातूर/प्रतिनिधी** : चन्नाबसवेश्वर फार्मसी कॉलेज डिग्री, लातूर या महाविद्यालयास त्यांच्या माजी विद्यार्थिनी अस्मिता तिगोटे यांनी संपादित केलेला कवितासंग्रह जीव गुंतताना भेट दिला. या आनंददायी प्रसंगात महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व सहाय्यक कर्मचाऱ्यांनी तसेच अलुम्नी असोसिएशनने अस्मिता तिगोटेला त्यांच्या लेखनकौशल्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या या उदार देणगीबद्दल आभार व्यक्त केले.

पुस्तकाचे औपचारिक सादरीकरण अलुम्नी असोसिएशनचे सचिव प्रा. मोईन एस. अत्तार यांना करण्यात आले. त्या प्रसंगी माझी विद्यार्थिनी मुगले वैष्णवी उपस्थित होत्या. या साहित्यिक भेटीमुळे महाविद्यालयाच्या ग्रंथसंग्रहाला समृद्धी मिळाली असून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण बनले.

## पवन ऊर्जा क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' पुरस्कार



**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांशी सुसंगत राहून महावितरणकडून अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. सन २०३० पर्यंतच्या दीर्घकालीन वीज खरेदी करारात पवन-सौर संकरित ऊर्जेचाही समावेश करण्यात आला आहे. त्याची दखल घेऊन भारतातील पवन ऊर्जा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंडियन विंड टर्बाइन मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशनच्या (IWTMA) चेन्नई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (दि. ३०) केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात अपर मुख्य सचिव (ऊर्जा) सौ. आभा शुक्ला यांनी राज्याच्या वीज क्षेत्रासाठी रिसोर्स अॅडेक्केसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनाद्वारे प्रामुख्याने सौर ऊर्जेसह पवन-सौर हायब्रिड, पवन, बगॅस, बायोमास व लघु जलविद्युत अशा विविध अक्षय स्रोतांपासून वीज निर्मितीला प्रोत्साहन मिळाले आहे. तर अपारंपरिक ऊर्जास्रोतांमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर दीर्घकालीन वीज खरेदी करार (पीपीए) केले आहेत. यात ४ हजार ३४४ मेगावॅट पवन-सौर संकरीत विजेसाठी दीर्घकालीन खरेदी करार करण्यात आले आहेत.

चेन्नई ट्रेड सेंटरमध्ये आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (दि. ३०) केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' पुरस्काराने गौरविण्यात आले. महावितरणच्या वतीने मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी (नवीकरणीय ऊर्जा, मुंबई) यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी ऊर्जामंत्री श्री. एस. एस. शिवशंकर (तामिळनाडू) व के. जे. जॉर्ज (केरळ), केंद्रीय सचिव श्री. संतोषकुमार सारंगी व सहसचिव श्री. राजेश कुलहारी (नवीन व नवीकरणीय ऊर्जा), श्री. जोहान साथॉफ (संसदीय राज्य सचिव, जर्मनी), आयोजन समिती व असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गिरीश तांती यांची उपस्थिती होती.

ऊर्जा विभागाच्या रिसोर्स अॅडेक्केसी प्लॅननुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेची सह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. महाराष्ट्रातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल व त्यायोगे सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे.

# विद्यार्थी हेच उत्तम समाजासाठी प्रभावी मेसेंजर

**लातूर/प्रतिनिधी** : येथील राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई इंग्लिश स्कूल येथे जागतिक बचत दिवसाचे औचित्य साधून आयोजित ऊर्जा बचत पंधरवडा २.० चे उद्घाटन जिल्हाधिकारी सौ वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महा उर्जा चे विभागीय व्यवस्थापक श्री आनंद कुलकर्णी, ऊर्जा परीक्षक केदार खमितकर यांची उपस्थिती होती.

आज उद्घाटन केलेली Save Million Units ही मोहीम पथदर्शी असून विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून निश्र्चित यशस्वी होईल, भविष्यासाठी ऊर्जाबचत हे नागरिकांचे महत्वपूर्ण उत्तरदायित्व असणार आहे. **कोरोनायुध्द आपण अनुभवले** ; यानंतरच्या काळात ऊर्जे साठीच युध्दजन्य परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पारंपरिक ऊर्जासंवर्धन आणि बचतीचे महत्त्व आहे म्हणूनच ऊर्जाबचतीसाठी जनजागृती करण्यास विद्यार्थी हेच खरे समाजात प्रभावीपणे बदल घडवू शकतात, यासाठीच मी राजा नारायणलाल लाहोटी सी.बी.एस.ई. ही पहिली शाळा निवडली अशी उद्घोषणाही जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांनी केली.

सौर उर्जेचा वापर अधिक्याने वाढवणे, अनावश्यक विद्युत दिवे, पंखे बंद करणे, स्वयंपाकघरातील गसचा मंद आचेवर वापर करणे, वाहनांचा वापर करताना सममजूतदारपणे इंधन बचत करणे अशा छोट्या छोट्या नागरी शिष्टाचारांतूनच भविष्यकालीन ऊर्जेची बचत आणि संवर्धन आपण करू शकतो असेही त्यांनी प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांच्या मनातील



उत्सुकतेला साद घालत त्यांनी अगदी मैत्रीपूर्णतेने विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला यावेळी Save Energy, Save Earth विषयावर अभिनव पेंटिंग, चित्रकला, फलक प्रदर्शनाचे उद्घाटन करीत आपल्या प्रतिसादाने विद्यार्थी - शिक्षक कर्मचारी वृंदाचे कौतुक केले.

यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत खमितकर असोसिएट व राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल यांच्या मध्ये ऊर्जा - हरित - पर्यावरण परीक्षण व क्षमता वर्धन यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.


ऊर्जा बचत हे राष्ट्रीय कर्तव्य असून, विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून आम्ही Save Million Units ही मोहीम यशस्वी करून, ऊर्जा बचतीची क्रांती घडवून आणण्याचा निर्धार यावेळी घेत आहोत, असा निश्र्चय प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु यांनी व्यक्त केला, तर ऊर्जा परीक्षक केदार खमितकर यांनी प्रबोधनपर संबोधन करून उपस्थितांना ऊर्जा बचतीची प्रतिज्ञा दिली.

प्रमुख अतिथी श्री आनंद कुलकर्णी यांनी ऊर्जा बचत, विद्यार्थी जीवन, नागरी कर्तव्य याविषयावर प्रबोधन करीत एक युनिट वाचविणे म्हणजे दोन युनिट निर्माण करणे असे योगदान असून प्रत्येक विद्यार्थ्याने ऊर्जा बचत हे कर्तव्य म्हणून स्वीकारावे असा आग्रहपूर्वक संदेश आपल्या मनोगतातून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इंग्रजी विभाग प्रमुख राणी आमले तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल संदीप केंद्रे यांनीं केले.

यावेळी कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, समन्वयक अरुल सेल्वी, कॅप्टन बी के भालेराव, मराठी विभाग प्रमुख देवयानी देशपांडे, अमित होनमाळे, हणमंत थडकर, अमोल देशमुख, प्रशांत शिंदे, वर्षा पाटणकर, पूनम सूर्यवंशी, प्रेरणा कडतणे, अरुण भोगे, विवेक डोंगरे, सुनील मुनाळे यांसह विद्यार्थी शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्याकडून माने परिवाराचे सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी** : पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार जोगेंद्र कवाडे यांनी पक्षाचे राज्य कार्यकारीणी सदस्य गजानन पांडुरंग माने ( जी. पी. माने ) यांचे आकस्मिक निधन झाल्याने त्यांच्या परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी स्व. माने यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. यावेळी नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव बापूसाहेब गजभारे, लातूर जिल्हाध्यक्ष एन. डी. सोनकांबळे, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनिस शेख, चाकूर तालुकाध्यक्ष मिलिंद कांबळे, लातूर शहर दर्शन सोनकांबळे, बालाजी कांबळे सुमेध सोनकांबळे,बी. एम कांबळे, भगवान माने, वैभव माने,अनोज कांबळे, नरसिंग गायकवाड, आदेश बनसोडे, आकाश कांबळे आदी उपस्थित होते

## वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदलअर्जांना आता स्वयंचलित मंजूरी, डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणचे आणखी एक पाऊल पुढे

**लातूर/प्रतिनिधी** : दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवेसाठी महावितरणने वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल (Change of Name) करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्यास सुरवात केली आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ तीन ते सात दिवसांमध्ये वीजबिलावरील ग्राहक नावामध्ये बदलाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यापूर्वी या प्रक्रियेस कृती मानकानुसार एक महिन्याचा कालावधी लागत होता. राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना तत्पर व घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी बिलावरील ग्राहक नावात बदल (Change of Name) करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नुकतीच ऑनलाइन प्रणाली विकसित व कार्यान्वित करण्यात आली आहे.

खरेदी-विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल अॅप व www.mahadiscom.in या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे व प्रक्रिया शुल्क (Processing Fee) भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्राहकांचे अर्ज, छानणी व मंजूरी या प्रक्रियेसाठी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकांप्रमाणे एक महिन्याचा कालावधी निश्र्चित करण्यात आला आहे. आता महावितरणकडून या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळत असल्याने नावात बदल करण्याची कार्यवाही केवळ तीन ते सात दिवसांमध्ये पूर्ण होणार आहे.

ग्राहक नावात बदल करण्याचा ऑनलाइन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रांची संबधित उपविभाग कार्यालयाकडून तपासणी होईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहकांना लगेचच नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे कळविण्यात येईल. सोबतच ग्राहक नावात बदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा संदेशही ग्राहकांना पाठविण्यात येईल. ग्राहक नावात बदल करण्याच्या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळणार असल्याने प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह इतर ग्राहकांना महावितरणच्या डिजिटल सेवेचा तत्पर लाभ होणार आहे.

महावितरणने याआधी लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. त्याचा वीजग्राहकांना मोठा लाभ झाला आहे. गेल्या महिन्याभरात २४६० औद्योगिकसह ४ हजार १६४ वीजग्राहकांनी एका क्लिकवर वीज भारामध्ये तब्बल २२ हजार किलोवॅटने वाढ केली आहे. त्यानंतर आता वीजबिलांवरील ग्राहक नावात बदल करण्याची मंजूरी स्वयंचलित केल्याने डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे.

## स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या पार्श्वभूमीवर प्रा. जोगेंद्र कवाडे यांचे महामानवास विनम्र अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरात उभारण्यात येणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य अशा ७५ फुटी स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणीच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी त्यांच्या समवेत एन. डी. सोनकांबळे जिल्हाध्यक्ष लातूर, अनिस शेख, जिल्हाध्यक्ष धाराशिव, बापूसाहेब गजभारे नांदेड, दर्शन सोनकांबळे,लातूर शहर,मदन तुळजापूरे उदगीर, आकाश तुळजापूरे, भालेराव, मिलिंद कांबळे, राजाभाऊ गायकवाड ,अशोक लामतुरे,बालाजी कांबळे, अशोक सुतार, प्रा. सुमेध सोनकांबळे,लातूर शहर, प्रशांत बनसोडे, भगवान माने, बी. एम. कांबळे, वैभव माने,अनोज कांबळे, नरसिंग गायकवाड .,आदेश बनसोडे, आकाश कांबळे,अजय गाथाडे , विजय उजळमकर राघवेंद्र आदीची उपस्थिती होती.



# साऊथचे लोक रोज भात खातात तरी पोट का सुटत नाही?

संस्कृतीतील एक प्रमुख अन्न आहे. भाताचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केल्यास बरेच फायदे होतात. दक्षिण भार-तात तांदूळ आणि तांदळाचे पदार्थ खाण्याचे प्रमाण जास्त आहे. आजकाल बरेचजण फिटनेसकडे लक्ष देत असताना आहारातून भात वगळतात किंवा कमी खातात. अशात दक्षिणेकडील लोक नेहमीच्या जेवणात भात खातात तरी त्यांचे पोट का सुटत नाही असा प्रश्न अनेकांना पडतो. यामागची मुख्य कारणं समजून घेऊ.

दक्षिण भारतीय लोक रोज भात खात असले तरी त्यांचे वजन न वाढण्यामागे केवळ भात नसून त्यांच्या संपूर्ण जीवनशैलीचा आणि आहाराच्या पद्धतीचा महत्वाचा वाटा आहे. वजन वाढणं किंवा कमी होणं हे कोणत्याही एका पदार्थावर अवलंबून नसून आहार, जीवनशैली, खाण्यापिण्याच्या इतर सवयींवर अवलंबून असते. कोणत्याही एका पदार्थांमुळे वजन वाढत नाही वजन वाढणं किंवा पोट सुटणं याला बऱ्याच गोष्टी जबाबदार असतात. दक्षिण भारतीय लोक फक्त भात खात नाहीत तर ते त्याला फायबर आणि प्रथिनांनी युक्त असलेला संतुलित आहार घेतात त्यांची जीवनशैलीही पुरक असते. त्यामुळे फक्त भात खाल्ल्यान त्यांचे वजन वाढत नाही. भात खाण्याची पद्धत

१) अनेक घरांमध्ये भात शिजवताना त्यातील अतिरिक्त स्टार्च काढून टाकलं जातं. यामुळे भातामधील काही कॅलरीज आणि ग्लुकोज कमी होण्यास मदत होते.

२) अनेकजण पॉलिश न केलेला तांदूळ किंवा जाड तांदूळ वापरतात. या प्रकारच्या तांदळात फायबर्सचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे पोट जास्तवेळ भरलेले राहते आणि पचन संथ होते.

३) भातासोबत रस्सम आणि विविध प्रकारच्या भाज्या खाल्ल्या जातात. सांबार आणि भाज्यांमध्ये फायबर्स, प्रथिने मुबलक प्रमाणात असतात जे भातामुळे मिळणाऱ्या कार्ब्सशी संतुलन राखतात.

४) अनेक पारंपारीक पदार्थांमध्ये सकाळच्या नाश्त्यात आणि जेवणात तेलाचा आणि तुपाचा वापर कमी केला जातो. तळलेल्या पदार्थांऐवजी वाफवलेले पदार्थ खाण्यावर जास्त भर असतो.

५) आहारात हळद, कढीपत्ता, आलं आणि मोहोरी यांसारख्या मसाल्यांचा वापर अधिक असतो. ज्यामुळे चयापचन क्रिया वाढवण्यास आणि पचनास चांगली मदत होते.

# चेहरा चमकदार बनवायचा आहे, मग व्यायाम करा



त्व-चेवरील चमक कायम राहण्याकरिता ज्याप्रमाणे आपण स्वच्छता व आहाराला महत्त्व देतो त्याप्रमाणे व्यायामही गरजेचा आहे. रोजच्या वेळापत्रकात थोडा बदल करून फक्त दहा मिनिटे हे व्यायाम करून त्वचेची चमक परत मिळवू शकता.

ताठ बसा. डोळे शक्य तितके मोठे करा. आधी घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने व विरा-ेधी दिशेने डोळे फिरवा. डोळे बंद करून पाचपर्यंत आकडे मोजा. हीच क्रिया दहा वेळा करा.

तोंड मिटा. नंतर एक दीर्घ श्वास घेऊन तोंड हवा घेऊन फुलवा. आता हवा एका गालात भरून दहापर्यंत आकडे मोजा. दुस-या गालात हवा भरा पाच आकड्यांपर्यंत आराम करा. ही क्रिया दहा वेळा करा.

आता गाल आत ओढून घ्या. अगदी दातावर गालाचा दाब पडेपर्यंत गाला आत ओढा.ताठ बसलेल्या स्थितीत दोन्ही ओठ उघडून खळखळून हसा. हसताना गालाच्या पेशींवर प्रभाव पडायला हवा.

पुन्हा ओठ बंद ठेवून स्मितहास्य करा, अशी क्रिया दहा वेळा करा.ताठ बसलेल्या स्थितीत चेहरा मागे झुकवा आणि छताकडे पाहा. ओठ बंद करा च्युइंगम चघळल्याप्रमाणे हालचाली करा, यामुळे गळ्याच्या पेशींना व्यायाम होईल.

ताठ बसून समोर पाहा आणि डोळे उघडून जोरात ओ म्हणून ओरडा नंतर याचप्रमाणे ई म्हणून ओरडा असे दोन्ही व्यायामाचे प्रकार केल्याने चेह-याच्या पेशींना व्यायाम मिळतो. झोपेसाठी औषध घेऊ नका, हे ५ काम केल्याने बिंदास आणि गाढ झोप लागेल

१. नियमित व्यायामाची सवय टाका, याने चांगली झोप लागते, पण झोपण्याअगोदर व्यायाम करू नये.२. झोपेच्या खोलीला शांत व अंधकारमय ठेवा. उठण्याची व झोपण्याची नियमित दिनचर्या बनवा. झोपेसाठी शवासन लाभदायक आहे.३. झोपताना सकारात्मक विचार मस्तिष्काला शांती देते.४. व्यावहारिक उपचार- काही खास व्यावहारिक उपायांमुळे देखील अनिद्रेची समस्येचा उपचार होऊ शकतो जसे - जर झोप नसेल येत तर बिस्तरावर जाऊ नये. झोपण्याच्या खोलीचा वापर फक्त झोपेसाठी करावा. बिस्तरावर पडल्या पडल्या झोपेची वाट पाहू नये. जेव्हा झोप येत असेल तेव्हाच बिस्तरावर पडावे.५. दर रोज सकाळी एका निश्चित वेळेवर उठा. रात्री निश्चित वेळेवर झोपा. लेट नाइट पार्टी व टीव्हीचा लोभ सोडा. दिवसा झोपू नये, ज्याने रात्री झोप लागण्यास मदत मिळेल.

# कर्जमाफीवर तोडगा?



शेतकर्यांच्या तातडीच्या गरजा लक्षात घेऊन त्याची पूर्तता करणे, त्यासाठी छोटे पॅकेज देणे आणि ते शेतकर्यांनी स्वीकारणे, टप्प्या टप्प्याने कर्जमाफी, कर्जावरील व्याजमाफी, आकस्मिक संकटात तातडीची मदत यांसारख्या उपाययोजनांनी शेतकर्यांना दिलासा देता येणे शक्य आहे.

शेतकर्यांच्या कर्जमाफीवरून नागपूरमध्ये एकवटलेल्या शेतकर्यांचे महाएल्गार मोर्चा आंदोलन आता थंडावले आहे. मुंबईत मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेने आंदोलनाचे नेते माजी राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे समाधान झाल्याचे दिसते. शेतकर्यांच्या कर्जमाफीबाबत शिफारशी सुचवण्यासाठी ९ सदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय या चर्चेत झाला. मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती या प्रश्नाच्या सर्व बाजूंचा विचार करून आपला अहवाल देईल. कर्जमाफीबाबत ३० जूनपर्यंत अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना दिले आहे. कर्जमाफीवर शिफारशी सुचवण्यासाठी नेमण्यात आ-लेली समिती व्यावहारिक स्वरूपाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन शिफारशी सुचवेल असे अपेक्षित आहे. मात्र राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता आंदोलकांच्या मागणीप्रमाणे सरसकट स्वरूपाची कर्जमाफी कितपत व्यवहार्य ठरेल आणि शेतकर्यांचे या शिफारशीवरून समाधान होईल का याबाबत शंका आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीआधी भारतीय जनता पक्षाने त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात शेतकर्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकर्यांनी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपुरात ठिय्या आंदोलन केले. शेतकर्यांच्या कर्ज माफीबरोबरच शेतमजूर, मच्छिमार आणि दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन होते. आंदोलकांनी रस्त्यावरील वाहने अडवल्याने नागपूरच्या न्यायालयालाही त्याची दखल घेऊन हस्तक्षेप करावा लागला, तरीही आंदोलन सुरूच राहिले. शेतकर्यांची कर्जमाफी, सोयाबीनसह इतर पिकांना हमीभाव, शेतकरी, मजूर दिव्यांग यांच्या कल्याणासाठी निश्चित धोरणे यासाठी बच्चू कडू आग्रही होते.

## आततायीपणा नको

शेतकर्यांच्या कर्जमाफीचा प्रश्न आजचा नाही, नैसर्गिक संकटे अतिवृष्टी, दुष्काळ यांसारख्या कारणांनी शेती उत्पादन घटणे हे इथल्या शेतकर्यांच्या कायमच नशिबी आ-लेले आहे. त्यामुळे कर्जमाफी किंवा त्यांचा सातबारा कोरा करण्याची मागणीही वेळोवेळी होत आली आहे. या आधी २०१७ मध्ये फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ३४ हजार कोटींची कर्जमाफी केली होती. आता पुन्हा कर्जमाफी केल्यास सरकारी तिज-ोरीवर ४० ते ४५ हजार कोटींचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. राज्याचा वार्षिक महसूल आणि खर्चाची तोंड मिळवणी करणे हे सरकार समोरचे मोठे आव्हान आहे. अलीकडेच राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याच्या आठ लाख कोटीच्या अंदाजपत्रकातील खर्चाचा हिशेबच मांडला. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकर्यांना ३१ हजार कोटीची मदत देण्यात येत आहे. सरकारी कर्मचार्यांच्या पगार आणि पेन्शनसाठी ४ लाख कोटी लागतात. शेतकर्यांची वीजबिले, दिव्यांग, श्रावणबाळ योजना यासाठीही मोठा खर्च होतो. असे त्यांनी म्हटले आहे. निवडणुका जिंकण्यासाठी जाहीर केलेली लाडकी बहीण योजना खर्चिक ठरत असून, ती सरकारच्या अंगलट आल्याचे दिसते. या परिस्थितीतून सरकारला कर्ज माफीबाबत व्यवहार्य तोडगा काढावा लागणार आहे. सरसकट कर्जमाफीऐवजी गरजू शेतकर्यांची कर्जमाफी यासारखा निर्णय घ्यावा लागेल. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सरसकट कर्जमाफीचा लाभ आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्यांनाही होतो असे म्हटले आहे. बच्चू कडू यांचीही काहीशी तशीच भूमिका आहे. श्रीमंत आणि नोकरी असलेल्या शेतकर्यांना कर्जमाफी नको, अशी तयारी त्यांनीही चर्चेआधी दाखवली होती. सरसकट कर्जमाफीचे लाभ खर्या गरजूपर्यंत पोहोचत नसल्याचा अनुभव या आधीच्या कर्जमाफीच्या निर्णयातून आला आहे. त्याऐवजी शेतकर्यांना शाश्वत स्वरूपाची मदत द्यावयास हवी. राज्याच्या तिजोरीवरील ताण कमी करण्यासाठी केंद्रानेही राज्याला आर्थिक हातभार लावण्याची गरज आहे. शेतकर्यांच्या मागण्या रास्त आहेत; पण त्यासाठी उग्र आंदोलनाची खरोखरच गरज आहे का याचा विचार आंदोलनाच्या नेत्यांनी करण्याची गरज आहे.

## स्तनपान देणार्या नवमातांसाठी खास ८ एक्सपर्ट टीप्स ! — डॉक्टर टीप्स



३. बाळाला स्तनपान कधी सुरु करावे? दिवसभरात किती वेळा स्तनपान करणे गरजेचे आहे? वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन(थकज),इंडीयन एकेडमी ऑफ पेडीयाट्रिक्स(ख-झ), ब्रेस्टफिडींग प्रमोशन नेटवर्क ऑफ इंडीया,अमेरिकन एकेडमी ऑफ पेडीयाट्रिक्स(--झ) ला लिचे लीग इंटरनॅशनल(डङडङ) या जगभरातील विविध संस्था व संघटनांनी दिलेल्या माहीतीनुसार कमीतकमी पहिले दोन वर्ष बाळाला स्तनपान करणे गरजेचे असते. सुरवातीला पहिल्या सहा महिन्यांमध्ये दिवसभरात १० ते १२ वेळा बाळाला स्तनपान करण्याची गरज असते. तसेच सहा महिन्यानंतर बाळाला इतर पोषक खाद्यपदार्थ देण्यास सुरुवात केल्यानंतरही एक वर्षापर्यंत बाळाला आईच्या दुधाची गरज असते.बाळाला इतर खाद्यपदार्थ देणे पूरक व पोषक असतेच.पण एक वर्षांपर्यंत त्या पदार्थांची सुरुवात केल्यानंतरही आईचे दूध बंद करु नये.

**(क्रमशः )**

## विनोद




बाळ- एक लहान मुलगा आणि मुलगी, बागेत झाडांना पाणी घालणाऱ्या टीचरला पाहून त्यांच्याकडे जातात.मुलगा - टीचर, २५ वर्षाचा मुलगा आणि २५ वर्षाची मुलगी यांना बाळ होऊ शकते.टीचर - हो.मुलगा - २० वर्षाचा मुलगा आणि २० वर्षाची मुलगी यांना बाळ होऊ शकते.टीचर - हो.मुलगा - दोघेही १५ वर्षाचे असतील तर?टीचर - हो, शक्य आहे.मुलगा - ठीक आहे. जर मुलगा आणि मुलगी दोघेही पाच वर्षाचे असतील तर, त्यांना बाळ होऊ शकते?टीचर - नाही छोट्या मुलाने मुलीकडे पहिले आणि तिला म्हणाला, बघ मी तुला सांगितले होते ना, घाबरण्यासारखे काही नाही.

## संदेश

teacher;tumhe pata h jab me

tumhari umar ka tha to mere full

marks aaya krte the

student peeche se comment krte

hue

student:ate honge ,aap ko koi

achha teacher padhate hoge...

## सुविचार



स्वानुभूति हेच माझे मत.

**- भगवान गौतम बुद्ध**


**संस्कृत सुभाषित**

**सान्ति दानान्यनेकानि किं तैस्तुच्छफलप्रदैः। अभीतिदानतुल्यं तु परमेकं न विद्यते ॥**

**अर्थ :** दानाचे अनेक प्रकार असतात. तुच्छ फलप्राप्ती देणाऱ्या दानांचा विचार तरी कशाला करायचा? सर्व दानांमध्ये आरोग्यदानाएवढे महत्त्वाचे दान नाही.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.२



## आडवे शब्द

३. राख,४. किंचित देखील
७. यादवीत बुडालेली नगर
१०. गीतेतील ज्ञान मराठीत आणणारे
१२. वर्ण
१४. रोटीचे एक धान्य
१५. दह्याचे पाचक पेय
१६. आयुष्यभर
१९. दिवाळीतील 'लक्ष्मी'
२१. दिसायला एकसारखे
२३. स्पष्ट केलेले
२६. वार्धक्य
२८. आयुष्य
२९. पाण्यातील सजीव
३१. वंश
३२. मीठ (हिंदी)
३५. शाश्वत, कायमचे
३६. सलगी
३७. लाकूड कापण्याचे साधन
३९. वादावादी
४०. आजोबा म्हणणारी
४१. पुष्कळ
४३. हेळसांड, दुर्लक्ष
४७. ठाऊक, ज्ञात
५०. मनोरंजन
५२. सामूहिक व्यायाम
५३. गुणांची कदर नसलेला
५५. यिंचा दंडावरचा दागिना
५६. संकट (ला.)
५७. दारू, मद्य
५८. न बोलण्याचे व्रत
६०. नाकारलेले
६२. पार्वती
६३. चार वेदांपैकी एक
६५. रवींद्रनाथांचे काव्य
६७. महिना
६८. कर्ज
६९. भेटवस्तू
७०. ठीक, बेताचा
७१. वर्षाव, सरबत्ती
७२. सरशी
७३. ताठा
७४. सुळका
७६. लाचार, उपकाराच्या ओझ्याला दबलेला
७७. भारतीय बाजारपेठेवर आक्रमण केलेला देश
७९. शत्रू
८०. चोप
८१. भंगूर
८२. उलट
८३. प्रशस्त, पाल्हाळिक

## उभे शब्द

१. खोटा, लटका,२. 'श्यामाची आई'चे लेखक
३. रामाचा एक भाऊ
५. बेडूक
६. क्रोध
८. तरुणी
९. चुलता
१०. राग आणणारे
११. जरब, भीती
१३. दरवाजा, दार
१७. प्रसाद, यज्ञातील आहुती
१८. आठवण (हिंदी)
२०. अमृत
२२. चिंचवड या नदीकाठी आहे
२४. त्वचेवर लावण्याचे औषध
२५. केस
२७. बुधकौशिक रचित स्तोत्र
२९. जयघोष
३०. रौप्य
३१. हुलगे
३३. मिठी
३४. खुमारी, स्वाद
३८. फरक
४०. अनुयायांसाठी आदर्श
४२. ताकद
४४. दमदाटी, दम
४५. सेपे
४६. तीव्र गरज
४७. असफल
४८. लकडा
४९. खुमखुमी
५१. पाठवणी
५४. थर्मामीटरमधील धातू
५६. अवस्था
५९. बुजणारा, संकोची
६०. असंतोष
६१. जंत
६२. कमी महत्त्वाचे
६३. सर्प
६४. जास्त किंमतीचे
६६. लाल
६८. सत्य
६९. उरलेले
७२. खोगीर
७४. अन्नाचा घास
७५. विष, ७७. भेग
७८. हे तर दुधातच लपलेले असते
८०. महाशिवरात्रीचा महिना

## आडवे उत्तर

३.भस्म ४.सुतराम ७.द्वारका १०.संत ज्ञानेश्वर १२.रंग १४.मका १५.ताक १६.तहहयात १९.केरसुणी २१.सरूप २३.विशद २६.जरा २८.जीवन २९.जलचर ३१.कुल ३२.नमक ३५.कायम ३६.जवळीक ३७.करवत ३९.हुज्जत ४०.नात ४१.फार ४३.हयगय ४७.अवगत ५०.करमणूक ५२.कवायत ५३.गाजरप-ारखी ५५.वाकी ५६.गदा ५७.सुरा ५८.मौन ६०.अस्वीकृत ६२.गौरी ६३.साम ६५.गीतांजली ६७.मास ६८.ऋण ६९.उपहार ७०.बरा ७१.मारा ७२.जीत ७३.गर्व ७४.कडा ७६.मिंधा ७७.चीन ७९.रिपु ८०.मार ८१.नश्वर ८२.विपरीत ८३.अघळपघळ

## उभे उत्तर

१.कृतक २.साने गुरुजी ३.भरत ५.तरंत ६.राग ८.रमणी ९.काका १०.संतापजनक ११.दहशत १३.द्वार १७.हवि १८.याद २०.सुधा २२.पवना २४.मलम २५.अलक २७.रामरक्षा २९.जयजयकार ३०.रजत ३१.कुळीथ ३३.कव ३४.लज्जत ३८.तफावत ४०.नायक ४२.रग ४४.धमकी ४५.सुकर ४६.निकड ४७.अयशस्वी ४८.तगादा ४९.सुरसुरी ५१.रवानगी ५४.पारा ५६.गत ५९.लाजरा ६०.असमाधान ६१.कृमी ६२.गौण ६३.साप ६४.महाग ६६.तांबडा ६८.ऋत ६९.उर्वरित ७२.जीन ७४.कवळ ७५.गरळ ७७.चीर ७८.तूप ८०.माघ



# क्रीडा विश्व





## स्मृती मंधानाची ऐतिहासिक कामगिरी

नवी मुंबई : डी. वाय. पाटील स्टेडियम येथे सुरू असलेल्या आयसीसी महिला वर्ल्डकप २०२५ च्या फायनल मॅचमध्ये भारतीय सलामीवीर स्मृती मंधानाने ५८ चेंडूत आठ चौकार मारत ४५ धावा केल्या. ती क्लो ट्रायॉनच्या चेंडूवर सिनालो जाफ्ताकडे झेल देऊन परतली. पण बाद होण्याआधी स्मृती मंधानाने एक ऐतिहासिक कामगिरी केली. स्मृतीने एका महिला वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान पटकावले. तिने मिताली राजचा विक्रम मोडीत काढला.भारताची फटकेबाजी, द. आफ्रिकेला दिले मोठे आव्हाननवी मुंबई : महिला वर्ल्डकप २०२५ ची फायनल मॅच डी. वाय. पाटील स्टेडियम येथे सुरू आहे. नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. प्रथम ...स्मृतीने आयसीसी महिला वर्ल्डकप २०२५ मध्ये ४३४ धावा केल्या. ही कामगिरी करुन स्मृतीने मिताली राजचा २०१७ चा एका महिला वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक धावा कराऱ्या भारतीय खेळाडूचा विक्रम मोडला. मितालीने २०१७ च्या महिला वर्ल्डकपमध्ये ४०९ धावा केल्या होत्या. आता एका महिला वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत स्मृती मंधाना पहिल्या आणि मिताली राज दुसऱ्या स्थानी आहे.

## भीषण अपघातामध्ये माजी क्रिकेटपटूचा मृत्यू



दिल्ली-भारतीय क्रिकेटसाठी आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. हरमनप्रीत कौर यांच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ पहिल्यांदाच महिला वनडे वर्ल्ड कपचं विजेतपद जिंकण्यासाठी अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मैदानात उतरणार आहे. पण या ऐतिहासिक सामन्याच्या आधीच भारतीय क्रिकेटविश्वातून एक दुख:त बातमी समोर आली आहे. माजी क्रिकेटपटू राजेश बानिक यांचे रस्ते अपघातात निधन झाले आहे.राजेश बानिक हा भारतीय अंडर-१९ संघाचं प्रतिनिधित्व केलेला खेळाडू होता आणि त्याचे वय फक्त ४० वर्षे होते. त्याचा मृत्यू पश्चिम त्रिपुरातील आनंदनगर येथे झाल्याचं सांगितलं जात आहे. त्याच्या निधनामुळे संपूर्ण क्रिकेट क्षेत्रात शोककळा पसरली आहे. राजेश बानिक हा इरफान पठाण आणि अंबाती रायुडू यांच्यासोबतही खेळला होता.त्रिपुरा क्रिकेट असोसिएशनचे सचिव सुब्रता डे यांनी त्याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना म्हटलं की, मफआम्ही एक प्रतिभावान क्रिकेटपटू आणि अंडर-१६ संघाचा निवडकर्ता गमावला आहेत. हे अत्यंत दु:खद आहे. भगवान त्याच्या आत्म्यास शांती देवो.फ्र मिळालेल्या माहितीनुसार, राजेश बानिक याचा भीषण रोड अपघात झाला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्याला अगरतला येथील जीबीपी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना वाचवू शकले नाही.

राजेश बानिक याने त्रिपुरासाठी रणजी ट्रॉफीमध्ये खेळताना उत्तम कामगिरी केली होती.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्या महिला विश्वविजेत्यांना शुभेच्छा

# अखेर स्वप्न पूर्ण, भारताने जिंकला महिला विश्वचषक





नवी मुंबई : अखेर भारताचे स्वप्न साकार झाले. भारताच्या महिला संघाने आयसीसी वर्ल्डकप पहिल्यांदाच जिंकला. नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय दक्षिण आफ्रिकेला भोवला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५० षटकांत २९९ धावा करण्याचे आव्हान दक्षिण आफ्रिकेला दिले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा डाव ४५.३ षटकांत २४६ धावांत आटोपला. भारताने फायनल मॅच ५२ धावांनी जिंकली.

दक्षिण आफ्रिकेकडून ताझमीन ब्रिट्स २३ धावा करुन धावचीत झाली. अँनेके बॉश शून्य धावा करुन श्री चरणीच्या चेंडूवर पायचीत झाली. सुने लुस २५ धावा करुन शफाली वर्माच्या चेंडूवर तिच्याच हाती झेल देऊन परतली. मॅरिझॅन कॅप चार धावा करुन शफाली वर्माच्या चेंडूवर रिचा घोषकडे झेल देऊन परतली. सिनालो जाफ्ता १६ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर राधा यादवकडे झेल देऊन तंबूत परतली. अँनेरी डर्कसेन ३५ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर त्रिफळाचीत झाले. लॉरा वोल्वार्ड १०१ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर अमनजोत कौरकडे झेल देऊन परतली. क्लो ट्रायॉन नऊ धावा करुन दीप्ती शर्माच्याच चेंडूवर पायचीत झाली. अयाबोंगा खाका एक धाव करुन धावचीत झाली तर नॅडिन डी क्लार्क १८ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर हरमनप्रीतकडे झेल देऊन परतली. क्लार्क बाद झाला आणि भारताच्या विजयावर औपचारिक शिक्कामोर्तब झाले. भारताकडून दीप्ती शर्माने पाच, शफाली वर्माने दोन तर श्री चरणी एक विकेट घेतली. दक्षिण आफ्रिकेचे दोन खेळाडू धावचीत झाले.

याआधी प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५० षटकांत सात बाद २९८ धावा केल्या. भारताकडून स्मृती मंधानाने ४५ धावा, शफाली वर्माने ८७ धावा, जेमिमा रॉड्रिग्जने २४ धावा, हरमनप्रीत कौरने २० धावा, दीप्ती शर्माने ५८ धावा, अमनजोत कौरने १२ धावा, रिचा घोषने ३४ धावा, राधा यादवने नाबाद ३ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून अयाबोंगा खाकाने ३ तर नॉनकुलुलेको म्लाबा, नॅडिन डी क्लार्क आणि क्लो ट्रायॉन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## वॉशिंग्टन सुंदरच्या नाबाद ४९ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय



होबार्ट-सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वात भारताने तिसऱ्या टी २० मॅचमध्ये ऑस्ट्रेलियाला पराभूत केलं आहे. भारताने दुसऱ्या टी २० मॅचमधील पराभवाचा बदला घेत विजय मिळवला. भारताच्या विजयामुळं पाच सामन्यांची मालिका सध्या १-१ अशा बरोबरीत पोहोचली आहे. भारताचा ऑलराऊंडर वॉशिंग्टन सुंदर याने नाबाद ४९ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. मात्र, प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार त्याला मिळाला नाही.

सूर्यकुमार यादवनं टॉस जिंकून प्रथम फलंदाजीसाठी ऑस्ट्रेलियाला आमंत्रित केले होते. ऑस्ट्रेलियाच्या डावाची सुरुवात खराब झाली होती. अर्शदीप सिंगने ट्रेविस हेड आणि जोश इंग्लिसला लवकर बाद केलं. मात्र, त्यानंतर टिम डेविडने ३८ बॉलमध्ये ७४ धावांची खेळी केली. मार्कस स्टोइनिसने ३९ बॉलमध्ये ६४ धावा करत संघाला २० ओव्हरमध्ये ६ विकेट १८६ धावांपर्यंत पोहोचवले.

भारताकडून अर्शदीप सिंगने ४ ओव्हरमध्ये ३५ धावा देत ३ विकेट घेतल्या. अर्शदीप सिंगने ट्रेविस हेड, जोश इंग्लिस आणि मार्कस स्टोइनिसला बाद केले. याशिवाय वरुण चक्रवर्तीने २ आणि शिवम दुबेने १ विकेट घेतली.

ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक धावा केल्या. सुंदरने २३ बॉलमध्ये ४ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने नाबाद ४९ धावा केल्या आणि संघाला विजयापर्यंत पोहोचवले. संजू सॅमसनच्या जागी संधी मिळालेल्या जितेश शर्माने १३ बॉलमध्ये ३ चौकारांच्या मदतीने २२ धावा केल्या आणि वॉशिंग्टन सुंदरला साथ दिली. अभिषेक शर्माने १६ बॉलमध्ये २५ धावा केल्या. तर, उपकॅप्टन शुभमन गिलने १२ बॉलमध्ये १५ धावा केल्या. कॅप्टन सूर्यकुमार यादव ११ बॉलमध्ये २४ धावा केल्या. तिलक वर्माने २६ बॉलमध्ये २९ धावा केल्या. अक्षर पटेलनं १२ बॉलमध्ये १७ धावा केल्या. दरम्यान, वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ४९ धावा केल्या असल्या तरी ऑस्ट्रेलियाला १८६ धावांवर रोखण्यात महत्त्वाची भूमि



का बजावणाऱ्या अर्शदीप सिंगला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार देण्यात आला. विशेष म्हणजे पहिल्या दोन टी २० सामन्यांमध्ये सूर्यकुमार यादवने अर्शदीप सिंगला संधी दिली नव्हती.

टीम इंडियाचे कमबॅक

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांपैकी तीन सामने पार पडले आहेत. पहिला सामना पावसामुळं रद्द झाला. तर, दुसऱ्या टी २० मॅचमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियानं पराभव केला आहे. तिसऱ्या टी २० मध्ये भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करत मालिकेत बरोबरी साधली आहे. आता यापुढील दोन्ही सामने जो संघ जिंकेल तो मालिका जिंकू शकतो. सूर्यकुमार यादवची टीम इंडिया वनडे मालिकेतील पराभवाची परतफेड करणार का हे पाहावे लागेल.



## अजितदादांना तब्बल २२ संघटनांचा पाठिंबा

पुणे-महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपमुख्यमंत्री अजित पवार दोघांनी अर्ज भरले होते. ऑलिम्पिक निवडणुकीत अजित पवार आणि मुरलीधर मोहाेळ आमनेसामने आले. अजित पवारांना तब्बल २२ संघटनांचा पावरफुल पाठिंबा मिळाला. अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा निवड झाली आहे. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन चे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली आहे. ३१ सदस्य संघटनांपैकी २२ पेक्षा जास्त संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला. त्यांच्या पॅनेलमधील आदिल सुमारिवाला, प्रदीप गंधे आणि प्रशांत देशपांडे हे तिघे उपाध्यक्षपदासाठी निवडणूक न होता निवडले गेले.

# विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात पुनरागमन करत शफालीची दमदार खेळी



महिला वर्ल्डकप २०२५ ची फायनल मॅच डी. वाय. पाटील स्टेडियम येथे सुरू आहे. नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेने गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५० षटकांत सात बाद २९८ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेपुढे ५० षटकांत २९९ धावा करण्याचे आव्हान ठेवले आहे. भारताकडून स्मृती मंधानाने ४५ धावा, शफाली वर्माने ८७ धावा, जेमिमा रॉड्रिग्जने २४ धावा, हरमनप्रीत कौरने २० धावा, दीप्ती शर्माने ५८ धावा, अमनजोत कौरने १२ धावा, रिचा घोषने ३४ धावा, राधा यादवने नाबाद ३ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून अयाबोंगा खाकाने ३ तर नॉनकुलुलेको म्लाबा, नॅडिन डी क्लार्क आणि क्लो ट्रायॉन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

**एका महिला वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांची यादी**

- स्मृती मंधाना - ४३४ धावा, २०२५
- मिताली राज - ४०९ धावा, २०१७
- पूनम राऊत - ३८१ धावा, २०१७
- हरमनप्रीत कौर - ३५९ धावा, २०१७
- स्मृती मंधाना - ३२७ धावा, २०२२

## प्लेअर ऑफ तोरनामेंटची ऐतिहासिक दावेदार



नवी मुंबई-आयसीसी वनडे वर्ल्ड कप २०२५ चा अंतिम सामना टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका महिला संघ यांच्यात सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. याच सामन्यात प्रतिका रावलच्या जागी आलेल्या शफाली वर्माने अप्रतिम फलंदाजी करत सगळ्यांचे मन जिंकले आहे . आपल्या वनडे करिअरमधील ही सर्वात मोठी खेळी करत शफालीने पुनरागमन केले आहे.

टीम इंडिया प्रथम फलंदाजीला उतरली. शेफालीने अवघ्या ७८ चेंडूमध्ये १११.५४ च्या स्ट्राईक रेटने ८७ धावांची जबरदस्त खेळी साकारली. तिच्या खेळीत ७ चौकार आणि २ षटकार होते.

याआधी बांगलादेश विरुद्धच्या लीग स्टेजमधील शेवटच्या सामन्यात फिल्डिंग करताना भारताची सलामी फलंदाज प्रतिका रावल जखमी झाली, त्यामुळे तिला आजचा अंतिम सामना हा खेळता आला नाही, याच्या आधीच्या न्यूझीलंड विरुद्धच्या सामन्यात तिने शतक ठोकले होते. त्यामुळे तिचं बाहेर जाणं हे टीमसाठी मोठा धक्का होतं. त्या जागी बराच काळ संघाबाहेर राहिलेली तरुण खेळाडू शफाली वर्माला पुन्हा संघात स्थान मिळालं.

पण तिच्यावर पहिल्याच संधीपासून चांगली कामगिरी करण्याचा दबाव होता . सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध तिने फक्त ५ चेंडूंमध्ये १० धाव केल्या, त्यामुळे काही चाहत्यांनी तिच्या निवडीवर प्रश्न उपस्थित केला पण फायनलमध्ये दमदार खेळी करून तिने सर्वांचीच तोंडे बंद केली आहेत.

# मध्य रेल्वेकडून सुरू असलेल्या विशेष मोहीम ५.० अंतर्गत स्वच्छता पखवाडा-२०२५ साजरा केला

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वच्छ खाद्य - स्वच्छ पाणी - स्वच्छ पर्यावरण अंतर्गत सुरू असलेल्या विशेष मोहीम ५.० अंतर्गत मध्य रेल्वेने ०१.१०.२०२५ ते १५.१०.२०२५ या कालावधीत 'स्वच्छता पखवाडा - २०२५' आयोजित केला. पंधरवडाभर चाललेल्या या स्वच्छता अभियानाचा उद्देश स्थानके, गाड्या, कार्यालये, वसाहती, कार्यशाळा, रुग्णालये, खाद्य स्टॉल्स इत्यादी सर्व ठिकाणी स्वच्छतेत दिसणारी लक्षणीय सुधारणा घडवून आणणे हा होता. ही मोहीम भारतीय रेल्वेच्या सर्व झोन, विभाग आणि कार्यशाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता अभियानाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. 'स्वच्छता पखवाडा - २०२५' अंतर्गत स्थानके, गाड्या, कार्यालये, कार्यशाळा आणि इतर रेल्वे परिसरात स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत स्वच्छ खाद्य, स्वच्छ पाणी आणि स्वच्छ पर्यावरण यांना विशेष महत्त्व देण्यात आले.

स्वच्छ आहार - स्वच्छ खाद्य स्वच्छ आहार उपक्रमाच्या अंतर्गत स्थानक परिसरातील तसेच परिसराभोवतालच्या कॅन्टीन व खाद्य स्टॉल्सची सखोल स्वच्छता संबंधित स्टॉलधारक व कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली. स्टॉलची स्वच्छता, देखभाल तसेच खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची तपासणी खाद्य सुरक्षा अधिकारी (FSO), मुख्य आरोग्य निरीक्षक (CHI) आणि त्यांच्या पथकांनी केली. पथकाने खाद्यपदार्थांच्या पाकिटांची पाहणी करून त्यावरील एक्सपायरी दिनांकाची तपासणी केली. मुख्य आरोग्य निरीक्षकांनी (CHI) स्टॉलधारकांशी संवाद साधून विक्रीस ठेवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत माहिती घेतली. त्यांनी विक्रेत्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेचीही तपासणी केली, विशेषतः नखांची स्वच्छता आणि ती योग्य प्रकारे कापलेली आहेत की नाही यावर विशेष भर देण्यात आला.

खाद्य स्टॉलधारकांना सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत





मार्गदर्शन करण्यात आले. गाड्यांमध्ये विशेषतः पॅन्ट्री कारची यादृच्छिकपणे (randomly) तपासणी करण्यात आली. पॅन्ट्री कारमधील कचरा संकलन व त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था तसेच कचरा वर्गीकरणासाठी बसविण्यात आलेल्या स्मार्ट बिन्सची कार्यक्षमता आणि त्यांच्या योग्य ठिकाणी केलेल्या स्थापनेची पडताळणी करण्यात आली. स्वच्छ खाद्य - निरोगी प्रवास या विषयावरील जनजागृती संदेश पत्रके व पॅन्ट्री कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवादाद्वारे प्रसारित करण्यात आले.

पॅन्ट्री कार कर्मचारी, स्वयंपाकी आणि बेअरर्स यांची वैद्यकीय तंदुरुस्ती तपासून कोणताही संसर्गजन्य आजार नाही याची खात्री करण्यात आली. पॅन्ट्री कार कर्मचाऱ्यांना स्वच्छता पद्धती, वैयक्तिक स्वच्छता व स्वच्छता जनजागृतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छ आहार उपक्रम २२९ ठिकाणी राबविण्यात आला असून ३१७ खाद्य स्टॉल्सची तपासणी व स्वच्छता करण्यात आली. तसेच ४०० हून अधिक डस्टबिन्सची स्थापना करण्यात आली. स्वच्छ नीर - स्वच्छ पाणी स्वच्छ नीर उपक्रमाच्या अंतर्गत मध्य रेल्वेने सर्व विभागांतील पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी व वॉटर स्टँड्सची सखोल स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली.

तसेच पाण्याची तपासणी करण्यासाठी नामांकित प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून तपासण्या व देखरेख करण्यात आली. जलशुद्धीकरण केंद्रे, जलसंस्था, फिल्टर हाऊस, पंप हाऊस आणि पाण्याच्या गाळण्याची प्रक्रिया म्हणजेच आधीचे (before) आणि पश्र्चात (पोस्ट) गुणवत्ता यासाठी स्टेशन परिसराची तपासणी करण्यात आली. मुख्य आरोग्य निरीक्षकांनी पाण्याच्या गाळण्याची प्रक्रिया तपासली. रेल्वे रुग्णालये, आरोग्य केंद्रे, रेल्वे शाळा, येथील जलसंस्था येथे सघन स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या.

**डेपो, स्टेशन आणि पाणी भरण्याचे ठिकाण.**

फिल्टरेशन प्लांट, पंप, पाइपलाइन आणि पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता आणि स्वच्छता यांचे निरीक्षण करण्यात आले. नळ आणि पाणी साठवण्याचे ठिकाणे साफसफाई करून स्वच्छ करण्यात आली आणि पाणी साचून राहण्याचे ठिकाणे साफ करण्यात आली. खराब झालेले पाईप दुरुस्त करून बदलण्यात आले आणि दूषितता टाळण्यासाठी नळीच्या पाईप्सचे योग्य स्टॅकिंगचे निरीक्षण करण्यात आले. अनेक स्थानकांवर पाणी सुज्ञपणे वापरा - नळ क्षेत्र स्वच्छ ठेवा असे लिहिलेले बोर्ड लावण्यात आले. ३४१ ठिकाणी स्वच्छ नीर मोहीम राबवण्यात आली आणि २७८४ वॉटर बूथ स्वच्छ करण्यात आले.

**स्वच्छ स्वच्छतागृह आणि स्वच्छ पर्यावरण - स्वच्छ शौचालये आणि पर्यावरण**

स्वच्छ स्वच्छतागृह मोहिमेचा एक भाग म्हणून, प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षित, सुलभ आणि आरोग्यदायी सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने, स्थानकांवर, कार्यालयांमध्ये आणि रेल्वे वसाहतींमध्ये शौचालयांची स्वच्छता करण्यात आली. यांत्रिक उपकरणे आणि साधनांचा वापर करून खोल साफसफाई करण्याचे प्रयत्न करण्यात आले आणि दुर्गंधीमुक्त आणि वापरकर्ता-अनुकूल सुविधा राखण्यासाठी पर्यावरणपूरक जंतुनाशकांचा वापर करण्यात आला. खराब झालेले फिटिंग्ज आणि फिक्स्चर दुरुस्त करण्यात आले आणि शौचालय परिसरात योग्य प्रकाश आणि वायुवीजन सुनिश्र्चित करण्यासाठी काळजी घेण्यात आली. स्वच्छ पर्यावरणाचा भाग म्हणून, हिरवळ वाढविण्यासाठी आणि हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी वृक्षारोपण मोहीम आयोजित करण्यात आली, तर कचरा स्त्रोताजवळच वेगळा करण्यासाठी आणि पुनर्वापर पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले गेले. स्वच्छ आणि पर्यावरणपूरक परिसर राखण्यासाठी कचरा, प्लास्टिक कचरा आणि भंगार साहित्य काढून टाकण्यात आले. कर्मचारी आणि सामान्य नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जबाबदार वर्तनाला प्रोत्साहन देण्यासाठी जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या. या उपक्रमाद्वारे भारतीय रेल्वेची पर्यावरणीय शाश्र्वततेबद्दलची बांधिलकी



आणि अधिक स्वच्छ, हरित परिसंस्था निर्माण करण्याची दिशा अधिक दृढ झाली. श्रमदान उपक्रमात एकूण १७३८८ जणांनी सहभाग घेतला आणि १०४० रोपे लावण्यात आली.

**स्वच्छ संवाद**

स्वच्छ संवाद उपक्रमाच्या अंतर्गत स्वच्छता स्पर्धा हे स्वच्छता पखवाड्याचे एक थीम म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. स्थानके व विविध युनिट्समध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे रँकिंग प्रणाली लागू करण्यात आले, ज्यामुळे सक्रिय सहभाग, नवनवीन कल्पना आणि सर्जनशीलता यांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले.

विभागांमध्ये आयोजित स्पर्धांमध्ये स्थानक स्वच्छतेचे मूल्यमापन, कार्यालयीन देखभाल, कचरा वर्गीकरण पद्धती आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देणारे नाविन्यपूर्ण उपक्रम यांचा समावेश होता. या स्पर्धांमध्ये कर्मचार्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला आणि स्वच्छता व स्वच्छतेची उच्च मानके राखण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्थानकांना, कार्यालयांना आणि व्यक्तींना योग्य सन्मान व पुरस्कार देण्यात आले. प्रवाशांकडून माहितीची देवाणघेवाण



आणि अभिप्राय मिळावा यासाठी नुक्कड नाटक सारख्या विविध उपक्रमांसह रेल्वे कर्मचाऱ्यांनी विविध स्थानकांवर प्रवाशांसह अमृत संवादला प्रोत्साहन दिले. जागरूकता निर्माण करण्यासाठी सुमारे २४० वेबिनार आयोजित करण्यात आले ज्यामध्ये ७२८७ हून अधिक लोकांनी भाग घेतला. ३५ हून अधिक नुक्कड नाटकांचे आयोजन करण्यात आले आणि प्रवाशांकडून एसएमएसद्वारे ७८० हून अधिक अभिप्राय प्राप्त झाले. विशेष मोहीम ५.० चा भाग म्हणून, मध्य रेल्वेने स्वच्छता आणि ई-कचऱ्याची पद्धतशीर विल्हेवाट यावर लक्ष केंद्रित करणारे उपक्रम हाती घेतले. मोहिमेत संपूर्ण स्वच्छता, सुधारित जागा व्यवस्थापन, कामाच्या ठिकाणाचे सौंदर्यीकरण, पर्यावरणपूरक उपक्रम, हरित पद्धती आणि नेटवर्कमधील डिजिटायझेशनवरही भर देण्यात आला. सार्वजनिक सहभागावर थेट लक्ष केंद्रित करणे, स्थानकांवर नागरिकांच्या अभिप्रायाचा समावेश करणे आणि अनावश्यक साहित्य आणि भंगाराची विल्हेवाट लावून जास्तीत जास्त महसूल मिळवणे, ज्यामुळे संपूर्ण रेल्वेमध्ये स्वच्छता आणि आधुनिक व्यवस्थापन मानके संस्थात्मक बनली.

# दयानंद शिक्षण संस्थेअंतर्गत ऊर्जा बचत जनजागृती कार्यक्रम - विश्व बचत दिनानिमित्त प्रेरणादायी उपक्रम

**सोलापूर/प्रतिनिधी :** ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऊर्जा वाचवा,पर्यावरण जपा - जागरूकता उपक्रम हा विशेष कार्यक्रम विश्र्व बचत दिन २०२५ निमित्त आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात प्रेरक ओळींनी झाली - बचत ही केवळ पैशांची नसते;ती ऊर्जेची,वेळेची आणि विचारांचीही असते...या उद्धाटन ओळींनी उपस्थितांना ऊर्जाबचतीचे सर्वांगीण महत्त्व समजावून सांगितले.या उपक्रमाचा उद्देश फक्त ऊर्जा बचत नव्हे,तर पर्यावरण संरक्षण आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणे हा होता.

'ऊर्जा बचत दिना' सोबतच 'राष्ट्रीय एकता दिवस ' आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचा सन्मानपूर्वक उल्लेख करण्यात आला. ऊर्जेची बचत,साधनांची बचत आणि विचारांची एकता - ह्याच तिन्ही गोष्टी आजच्या दिवशी एकत्र आल्या आहेत,या विचारांनी कार्यक्रमाला प्रेरणादायी दिशा मिळाली.कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेने तयार केलेल्या ऊर्जा बचाओ, भविष्य सजाओ या संदेशप्रधान पोस्टरच्या अनावरणाने झाले.या पोस्टरद्वारे फाइव स्टार रेटिंग उपकरणांचा वापर,एसी २४ओउ वर वापरणे,हरित भवन संकल्पना,तसेच जबाबदार आणि पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान



दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी भूषविले.प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री.आनंद कुलकर्णी,महाव्यवस्थापक, महाऊर्जा विभाग,लातूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना ऊर्जेच्या कार्यक्षम वापराविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी ऊर्जा परीक्षक श्री.केदार खमीदकर व श्री.किरण खमीदकर, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,सेल्फ फायनान्स विभागाचे प्राचार्य प्रा.अनिलकुमार माळी,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे तसेच पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी ऊर्जा बचतीचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी ऊर्जा संवेदनशील जीवनशैली अंगीकारावी,असे सांगितले.प्रमुख वक्ते मा.श्री.आनंद कुलकर्णी यांनी ऊर्जा व्यवस्थापन, नवीकरणीय ऊर्जा आणि शाश्र्वत विकास या विषयांवर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले, तर श्री.केदार खमीदकर, ऊर्जा परीक्षक,लातूर यांनी व्यवहार्य आणि घरगुती पातळीवरील ऊर्जाबचतीचे उपाय सविस्तरपणे सांगितले.अध्यक्षीय भाषणात डॉ.जयप्रकाश दरगड यांनी विद्यार्थ्यांनी ऊर्जासंवेदनशील नागरिक बनून पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी,असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ.कोमल गोमारे यांनी सादर केले,तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी केले.महाविद्यालयातील इयत्ता अकरावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी ऊर्जा बचतीची शपथ घेत ऊर्जा वाया न घालवण्याचे व पर्यावरण संवर्धनाचे वचन दिले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितेश दुधभाते,डॉ. दीप्ती ढेरे,तसेच कदम,बचाटे,स्वप्नील आणि इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत सजगता,एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना जागवणारा ठरला.कार्यक्रमाचा समारोप सर्वांच्या सामूहिक घोषवाक्याने झाला - ऊर्जेची प्रतिज्ञा व ऊर्जा वाचवा,जग वाचवा या घोषणेने झाला.

**महाराष्ट्र शासन**

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.

**जलसंपदा विभाग**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय, आनंद नगर सिंचन भवन, धाराशिव**

E-mail :- eelisdn@gmail.com दूरध्वनी क्र.०२४७२-२९५१७१

## ई-निविदा सूचना क्र-४ सन २०२५-२६ (ऑनलाईन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** हे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव व किमत :- | कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. १ अंतर्गत टप्पा क्र.५ मधील इराचीवाडी साठवण तलाव ता. भुम जि. धाराशिव बुडीत क्षेत्रातील रसत्याची (ODR-16) (भाग-१) उंची वाढ करणे व पुलांचे बांधकाम करणे. **(निविदा कामची किंमत रु.२११.०१ लक्ष (वस्तु व सेवाकर वगळता))** |
| २. | कामाचे नांव व किंमत :- | कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. २ अंतर्गत नळदुर्ग बॅरेज क्र.२ ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील बुडीत क्षेत्रातील स्मशानभुमीस सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे. **(निविदा कामची किंमत रु.११२.७० लक्ष (वस्तू व सेवाकर वगळता))** |
| ३. | इसारा/बयाना रक्कम :- | वरील अ.क्र. १ ते २ या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIT) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ४. | काम पूर्ण करण्याचा कालावधी :- | **प्रत्येकी १२ महिने** |
| ५. | ई-निविदा संचाची किमत:- | **प्रत्येकी रु.२३६०/- (GST सह)** |
| ६. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग:- | **निविदेतील अटी व शती पूर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार** |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी **दि. ०३/११/२०२५ ते दि.१०/११/२०२५**
२. ई निविदा उघडणे दिनांक **१२/११/२०२५** रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालयातील सूचना फलक.
५. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.

**जा.क्र/उसिंवि/निविदा/२८८२/२०२५**
कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव
यांचे कार्यालय. **दिनांक:-३०/१०/२०२५**

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**उपसा सिंचन विभाग, धाराशिव**

# राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी :** आंतराष्ट्रीय नामांकन ( आय एस ओ २०१५ ) प्राप्त डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया द्वारा आयोजित राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झालेली सोलापूर येथील सोनार समाज संस्था यांचेकडून राज्यस्तरीय पुरस्कारासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील पांचाळ सोनार समाजातील उल्लेखनीय आणि लक्षवेधी कामगिरी केलेल्या पुरुष व महिला यांच्या कार्याची एकत्रित रित्या ओळख समाजाला व्हावी म्हणून १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. पुरस्काराचे स्वरूप फोटोसह रंगीत सन्मान पत्र, भव्य आकर्षक सन्मान चिन्ह आणि सन २०२५ हे वर्ष ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष ( ७५० वी जयंती ) साजरे होत आहे. म्हणून आकर्षक, मजबूत बांधणी चे ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्यात येत आहे. याशिवाय पारंपारिक फेटा, आकर्षक बिल्ला, आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत, सन्मान करण्यात येणार आहे. तरी राज्यातील पांचाळ सोनार समाजातील विविध क्षेत्रात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, उद्योग, पत्रकारिता, सहकार, क्रीडा, कला, वैध्यकीय, साहित्यिक वकील, कृषी, प्रशासकीय आदी क्षेत्रात उल्लेखनीय आणि लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या पुरुष, महिलां यांनी १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आपले प्रस्ताव ऑनलाईन पाठविणेसाठी अध्यक्ष वसंत पोतदार ९४२३० ६५९१५, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार ९०४९९ ९६९४६, सचिव दत्तगुरु वेदपाठक ८०८७४ २१०२५ यांचेशी इच्छुकांनी संपर्क साधून ऑनलाईन लिंकची मागणी केल्यास संबंधिताना पाठविणेत येईल. कांही अटी, शर्ती लागू. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निवड समितीकडून पुरस्कार प्राप्त व्यक्तींना कळविण्यात येणार आहे. तरी इच्छुक समाज बांधवानी आपले प्रस्ताव मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी तसेच युवक वर्गासाठी त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील प्रचंड उत्कृष्ठ कार्यासाठी राज्यस्तरीय युवा रत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. युवकाना सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ठता प्राप्त करण्यासाठी व त्यांच्या मध्ये समाजाप्रती जबाबदारीची भावना विकसित करण्यासाठी आणि अशा प्रकारे चांगले नागरिक म्हणून त्यांची स्वतःची वैयक्तिक क्षमता सुधारण्यासाठी, त्यांना प्रेरित करण्यासाठी पुरस्कार दिला जाणार आहे. तरी युवकांनीही राज्यस्तरीय युवा रत्न पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करावा असे आवाहन सोलापूर सोनार समाज संस्थेने केले आहे.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# परंडा-वारदवाडी रस्त्याची दुरवस्था अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी!



परंडा(प्रतिनिधी)-परंडा-वारदवाडी रस्ता खड्ड्यांनी भरून दुरवस्थेला पोहोचला असून वाहनधारक व ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत असून नागरिकांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाबद्दल ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघर्ष संघटनेतर्फे गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी तहसिलदार व सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात निवेदन देण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष नागनाथ नरुटे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सादर केलेल्या निवेदनात परंडा-वारदवाडी रस्त्याचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करावे, आवारपिंपरी ते सिना नदीपर्यंतचा रस्ता दुरुस्त करावा, ठेकेदार एस.बी. देशमुख यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी आणि संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या. त्वरित दुरुस्तीचे काम सुरू झाले नाही, तर संबंधित अधिकाऱ्याच्या तोंडाला काळे फासण्याचा आणि ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा कठोर निर्णय घेण्यात येईल असा इशारा प्रशासनास संघटनेच्यावतीने देण्यात आला. निवेदनावेळी रत्नमाला निकाळजे, मंगल चव्हाण, आशा गव्हाणे, लक्ष्मी शिंदे, सोमनाथ गायकवाड, गुलाम पटेल, नाना मुंगशे, शोभा मुंगशे, शमा शेख, अनिल जाधव, बाळू काळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भूममध्ये ९७,४०१ पंचनामे, मात्र फक्त २४२४५ खात्यावर मदत

भूम(प्रतिनिधी)-ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. खरीप पिके वायाच गेली. अतिवृष्टीमुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली. अनेकांच्या घरांत पाणी शिरले. शेतकऱ्यांचे काढणीला आलेले खरीप पीक रातोरात नेस्तनाबूत झाले. भूम तालुकल्यातील ९७,४०१ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे पंचनामे झाले. त्या बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. अद्याप ऑगस्टमधील २०५३८ तर सप्टेंबरमधील ३७०७ शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली आहे. दिवाळी होऊन आठ दिवस झाल्यानंतरही केवळ ४० टक्के शेतकऱ्यांच खात्यावर अनुदान जमा झाले आहे. ऐन दिवाळीत बहुतांश बाधित शेतकऱ्यांच्या वाट्याला शिमगा आला. बाकीचे शेतकरी अनुदानाकडे आस लावून बसले आहे. ज्यांची जमीन खरडून गेली आहे, अशा शेतकऱ्यांना एक छदामही मिळाला नाही. तालुक्यामध्ये हजारो हेक्टरवर काढणीला आलेल्या सोयाबीनचे. पण, सुरुवातीपासूनच पावसाची वक्रदृष्टी राहिल्याने प्रारंभी पावसाअभावी तर नंतर अतिवृष्टीने खरिपाचा हंगाम हिरावून घेतला. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने सोयाबीन पिकांचे प्रचंड नुकसान झाले, तर आता अवकाळी पावसाने संकटात आणखीच भर घातली आहे. अतिवृष्टीमुळे तालुक्यातील ९७४०१ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याने शासनाने तातडीने पंचनामे करून मदतीची घोषणा केली. त्यासोबतच दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची राशी जमा करण्याचे निर्देश दिले होते. परंतु शेतकऱ्यांना आता सर्व मदत ही मुंबई येथून सरकारकडून पाठवली जात आहे. शेतकऱ्यांची अद्ययावत माहिती पाठवूनही मदत खात्यावर जमा होत नसल्याने शेतकरी गोंधळात सापडला आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी व आधार कार्ड वरील नावात बदल आल्याने अशा शेतकऱ्यांना मदत मिळण्यास विलंब लागत आहे. सरकारकडून शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम वळती करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. परंतु ही मदत तत्काळ न मिळाल्यास आगामी निवडणुकीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# तुळजापूर शुगरचा पहिला गळीत हंगाम मोळी पूजन सोहळा उत्साहात संपन्न



तुळजापूर(प्रतिनिधी)-तुळजापूर शुगर प्रा. लि. येथे पहिल्या गळीत हंगामाचा मोळी पूजन सोहळा उत्साहात आणि मंगलमय वातावरणात शनिवार १ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. ऊस गाळपाच्या शुभारंभी कारखाना परिसरात शेतकरी, कामगार आणि मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्याचे पूजन भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री. विनोद गपाट आणि ॲड. अनिल काळे, चेअरमन, तुळजापूर शुगर प्रा. लि. यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक आदित्य काळे, संचालक ऋषिकेश वडगांवकर अधिकारी, कर्मचारी, तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना ॲड. अनिल काळे म्हणाले, की तुळजापूर शुगर प्रा. लि. हा केवळ एक कारखाना नसून, शेतकऱ्यांचा आणि स्थानिक जनतेचा विकासाचा एक केंद्रबिंदू आहे. या उपक्रमातून ग्रामीण भागातील युवकांना रोजगार उपलब्ध होईल, तसेच शेतकऱ्यांना ऊसासाठी हमीभाव आणि वेळेवर पैसे मिळतील असा विश्वास व्यक्त केला.

श्री. विनोद गपाट यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.शुभारंभ प्रसंगी धार्मिक विधी, मोळी पूजन आणि पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून कारखान्याच्या गळीत हंगामाची सुरुवात करण्यात आली. परिसरात सर्वत्र आनंदाचे वातावरण होते.

तुळजापूर शुगर प्रा. लि. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देत शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे, अशी माहिती संस्थेच्या अधिकाऱ्यांनी दिली.यावेळी सभासद, शेतकरी, कामगार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक आघाडी जिल्हा कार्यकारिणी घोषित

धाराशिव (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्ष प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांच्या मान्यतेने मा. आ.श्री. राणाजगजितसिंह पाटील यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या सहकार्याने भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक आघाडी जिल्हा संयोजक युवराज बप्पा नळे यांनी धाराशिव जिल्ह्याची कार्यकारिणी घोषित केली आहे.

भारतीय जनता पार्टी (सांस्कृतिक आघाडी) जिल्हा धाराशिव कार्यकारिणी

१) कार्याध्यक्ष - कमल चव्हाण
२) उपाध्यक्ष - विशाल टोले
३) उपाध्यक्ष - दर्शन सुरवसे
४) उपाध्यक्ष - डॉ सत्यवान गोरे
५) सरचिटणीस - मल्लिकार्जुन साखरे
६) सरचिटणीस - संग्राम बनसोडे
७) सरचिटणीस - अमर सुपेकर
८) चिटणीस - शहाजी राठोड
९) चिटणीस - चंद्रकांत धुर्वे
१०) चिटणीस - तुकाराम वाडकर
११) कोषाध्यक्ष - राजेश शिंदे
१२) प्रसिद्धी प्रमुख - अजित खापरे
१३) का. सदस्य - सुशील ढोबळे
१४) का. सदस्य - दयानंद पांचाळ
१५) का. सदस्य - अनिता विधाते
१६) का. सदस्य - संजीव कांबळे
१७) का. सदस्य - बिभीषण पवार
१८) का. सदस्य - योगेश वाघमारे
१९) का. सदस्य - प्रकाश मडके

धाराशिव जिल्ह्याला मोठी सांस्कृतिक परंपरा असून भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक आघाडीच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्याची सांस्कृतिक चळवळ रुजविण्याचे व वाढविण्याचे कार्य या कार्यकारिणीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर होईल असा विश्वास युवराज नळे यांनी व्यक्त केला. नवीन कार्यकारिणीचे मा.आ. श्री. राणाजगजितसिंह पाटील, मा आ सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, अमित शिंदे व सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# धाराशिव शहर खड्डेमुक्त होणार; राजमाता जिजाऊ चौक ते सांजा रोड भवानी चौक रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन: शिवसेना जिल्हाप्रमुख यांच्या प्रयत्नांना यश



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहरातील राजमाता जिजाऊ चौक ते सांजारोड भवानी चौक या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. कायम रहदारी असलेल्या या मार्गाच्या कामाला एमएसआयडीसी अंतर्गत हायब्रीड ॲन्युटीमधून मंजुरी मिळालेली असून धाराशिव शहराची खड्डेमुक्तीकडे वाटचाल सुरू झाली आहे.

धाराशिव शहरातील राजमाता जिजाऊ चौक, आर्य समाज चौक, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सांजा रोड भवानी चौक या मार्गावर कायम रहदारी असते. याच मार्गावर बहुतांश शाळा आणि कॉलेज आहेत. त्यामुळे सकाळपासून सायंकाळपर्यंत नेहमी विद्यार्थ्यांची वर्दळ असते. त्याचबरोबर या मार्गावर व्यापारी संकुल आहेत. या रस्त्याची अत्यंत दूरवस्था झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. त्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, पालकमंत्री प्रतापजी सरनाईक यांच्याकडे सतत पाठपुरावा करून निधी मंजूर करवून घेतला. त्यानंतर शुक्रवारी या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय आता दूर होणार आहे. भूमिपूजन कार्यक्रमास शिवसेना जिल्हा संघटक सुधीर (अण्णा) पाटील, धाराशिव शहरप्रमुख आकाश कोकाटे यांच्यासह शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, महिला पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# एनव्हीपी शुगरच्या द्वितीय गळीत हंगामात गाळपास आलेल्या ऊसाचे पहिल्या पंधरवाड्याचे बिल शेतकऱ्याच्या खात्यात जमा- चेअरमन नानासाहेब पाटील

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि. या कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या द्वितीय गळीत हंगामात गाळपासाठी आलेल्या पहिल्या पंधरवाड्यातील ऊसाचे बिल संबंधित शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेले आहे. चाचणी गळीत हंगामापासून सुरू करण्यात आलेली ही परंपरा द्वितीय हंगामातही कायम ठेवण्यात आली असून शेतकऱ्यानी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या शाखेत जावून आपले बिल असे आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.



चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील

जागजी शिवारात उभारण्यात आलेल्या एनव्हीपी शुगर प्रा. लि. या कारखान्यामार्फत चाचणी गळीत हंगामापासून गाळपास आलेल्या ऊसाचे बिल पंधरा दिवसांत शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्याची घोषणा चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केली होती. यंदाच्या गळीत हंगामात देखील त्यांनी मोळीपूजन कार्यक्रमात दिलेल्या शब्दाप्रमाणे पहिल्या पंधरवाड्यातील ऊसाचे २५०० रूपयेप्रमाणे बिल तात्काळ ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या खात्यात जमा केलेले आहे.

तोडणीनंतर गाळपास आलेल्या ऊसाचे अवघ्या पंधरा दिवसांत बिल अदा करणारा कारखाना म्हणून एनव्हीपी शुगरने चाचणी हंगामापासून शेतकर्यांचा विश्वास संपादन केला आहे. यावर्षीच्या हंगामात अतिवृष्टीमुळे अडचणी आल्या तरी कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी नियोजनबद्ध यंत्रणा राबवून हंगाम यशस्वी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे हित समोर ठेवलेले आहे. त्यामुळे द्वितीय हंगामातही ऊस उत्पादक शेतकऱ्याचा एनव्हीपी शुगरला ऊस देण्यासाठी कल वाढला आहे.

कारखान्याला ऊस गाळपासाठी दिलेल्या शेतकऱ्यानी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे, यापुढेही गाळपास आलेल्या ऊसाचे बिल संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अवघ्या पंधरा दिवसांत जमा करण्यात येईल असेही चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी सांगितले.

# कपाटातील सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कमेची चोरी

भुम (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अनिल यादव दुधाळ, वय ५६ वर्षे, रा.विद्यानगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे राहते घराचा कुलूप कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२९.१०.२०२५ रोजी २२.०० ते दि.३०.१०.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम ६०,००० असा एकुण १,३४,००० किंमतीचा माला सह एस बी आय बॅक शाखा भुम येथील लॉकरची चावी चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अनिल दुधाळ यांनी दि.३१.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५,३३१(४),६२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# तुरोरी येथून सोन्याच्या दोन अंगठ्याची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत भद्रया महाद्या स्वामी, वय ४२ वर्षे, रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव यांचे घर-ातील कपाटातील डब्यामध्ये ठेवलेले २० ग्रॅम वाजनाचे सोन्याच्या दोन अंगठ्या एकुण ४७,००० किंमतीच्या या दि.३०.१०.२०२५ रोजी ०३.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी भद्रया स्वामी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649